जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २९/१०/२०२४**

**ठाणे पोलीस आयुक्तालयात सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित केल्या बाबत.**

सध्या अस्तीत्वात असलेल्या पोलीस ठाण्यांव्यतिरिक्त सायबर लॅब/तंत्रज्ञानयुक्त गुन्हे अन्वेषण केंद्राना ''सायबर पोलीस ठाणे'' असे घोषित करण्यात आल्या बाबत महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरूवार ते बुधवार, नोव्हेबर १७-२३,२०१६/कार्तिक २६-आग्रहायण २, शके १९३८ गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ अन्वये अधिसुचना जाहीर करण्यात आली होती. सदर अधिसुचने प्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालयातील **'सायबर क्राईम ईन्वेस्टिगेशन'** सेल यास करीता पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे.

या बाबत पोलीस मुख्यालय कॅम्पस्, शासकीय विश्रामगृहाजवळ, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम येथे **'सायबर पोलीस ठाणे'** साठी स्वतंत्र नविन ईमारतीचे बांधकाम करण्यात आले असुन, दिनांक २९/१०/२०२४ रोजी श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग तसेच आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि सायबर पोलीस ठाण्यातील नियुक्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे उपस्थितीमध्ये अत्याधुनिक यंत्रणेने सुसज्ज असे सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आले आहे.

**सायबर पोलीस ठाण्याचा कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता:-**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सायबर पोलीस स्टेशन, ठाणे शहर
पत्ता :-ठाणे शहर पोलीस मुख्यालय कॅम्पस्,
शासकीय विश्रामगृहाजवळ, कोर्ट नाका,
ठाणे पश्चिम जि. ठाणे ४०० ६०१
दुरध्वनी क्रमांक :- ०२२:२५४२९८०४
ईमेल :- cp.thane.ccic@mahapolice.gov.in
WEB SITE:- www.thanepolice.gov.in

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर